# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC-2007/(322/07)/UNI-4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

National Service Scheme

**Dr. Shyam Khandare**
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI - 442 605 (M.S.)
web www.unigug.org
Email : nssdsw.gug@gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/231/2025

Dt : 12/12/2025

**प्रति,**

मा. प्राचार्य / विभागप्रमुख / रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— सन २०२५—२६ या वर्षात ''उत्कर्ष'' सामाजीक व सांस्कृतीक राज्यस्तरीय महोत्सव मध्ये विद्यापीठ संघ सहभाग होण्याकरीता आयोजीत निवडचाचणी करीता स्वयंसेवक पाठविणे बाबत......**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, **सन २०२५—२६ या वर्षात ''उत्कर्ष'' सामाजीक व सांस्कृतीक राज्यस्तरीय महोत्सवाचे** आयोजन दि. ०५ ते ०७ जानेवारी २०२६ या कालावधीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ, सोलापुर येथे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबीरामध्ये गोंडवाना विद्यापीठाचे ०९ मुले, ०९ मुली, ०१ संघनायक असे एकुण २१ लोकांचा संघ सहभागाकरीता पाठविणे अनिवार्य आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या दृष्टीने आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांची संलग्नीत नियमावलीच्या आधाराने निवड करुन विद्यापीठस्तरीय संघामध्ये सहभागी होण्यासाठी पाठविणे अनिवार्य आहे. रासेयो स्वयंसेवकांची निवड करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील स्वंयसेवकांना दिनांक २१/१२/२०२५ रोज रविवारला सकाळी १० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे महाविद्यालय पत्र, ओळखपत्र, व जन्मतारीखीचा पुरावासह उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावे. हि विनंती. (रासेयो स्वयंसेवक, स्वयंसेविका व कार्यक्रम अधिकारी यांचा प्रवास खर्च, दैनिक भत्ता महाविद्यालयातील नियमित अनुदानातुन करावा.)

धन्यवाद !

**निवडचाचणी स्थळ:— गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
**दिनांक :— २१/१२/२०२५**
**दिवस :— रविवार**
**वेळ :— सकाळी १० ते ४ पर्यंत**

डॉ. श्याम खंडारे
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

संलग्नीत पत्र
१) उत्कर्ष :— राज्यस्तरीय सामाजीक सांस्कृतीक स्पर्धा नियमावली

परिशिष्ट “अ”

**राष्ट्रीय सेवा योजना कक्ष उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय राज्यस्तरिय सामाजिक व सांस्कृतिक “उत्कर्ष” स्पर्धा,सहभागी संघ २०२५-२६**

| अ.क्र. | विद्यापीठाचे/संचालनालयाचे नांव | कार्यक्रम अधिकारी | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | १ | ९ | ९ | १९ |
| २ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | १ | ९ | ९ | १९ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर | १ | ९ | ९ | १९ |
| ४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १ | ९ | ९ | १९ |
| ५ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ | ९ | ९ | १९ |
| ६ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | १ | ९ | ९ | १९ |
| ७ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | १ | ९ | ९ | १९ |
| ८ | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | १ | ० | १८ | १९ |
| ९ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | १ | ९ | ९ | १९ |
| १० | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | १ | ९ | ९ | १९ |
| ११ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | १ | ९ | ९ | १९ |
| १२ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | १ | ९ | ९ | १९ |
| १३ | भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे | १ | ९ | ९ | १९ |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड | १ | ९ | ९ | १९ |
| १५ | कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर | १ | ९ | ९ | १९ |
| १६ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | १ | ९ | ९ | १९ |
| | आयोजक, रासेयो स्वयंसेवक व इतर | २६ | | | |
| | **एकूण** | **१६** | **१३५** | **१५३** | **३०४** |
| | **एकुण** | **३३०** | | | |

**(डॉ. मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

# राष्ट्रीय सेवा योजना कक्ष
# उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय

उत्कर्ष - राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा

## नियमावली

१. प्रत्येक विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेतर्गत उत्कृष्ट स्वयंसेवकांची निवड चाचणी द्वारे संघ तयार करतील.
२. संघ संख्या १९ असेल, त्यात ९ स्वयंसेवक व ९ स्वयंसेविका व १ कार्यक्रम अधिकारी यांचा समावेश असेल,
३. सहभागी संघास राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे माहित असावीत.
४. संघातील प्रत्येक स्वयंसेवक राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक राहील व त्याचे वय स्पर्धे दरम्यान २५ वर्षे पूर्ण नसावे.
५. संघ पात्रतेची पूर्ण जबाबदारी संबंधित कार्यक्रम समन्वयक यांच्यावर राहील.
६. सहभागी संध आरोग्यदृष्ट्या सक्षम असेल याची खात्री करावी व सोबत डॉक्टरांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र असावे.
७. सहभागी संघातील प्रत्येक स्पर्धकास पालक व तसेच प्राचार्याच्या सही शिक्क्यासह सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे संमतीपत्र जोडणे बंधनकारक राहील.
८. परीक्षकांनी दिलेले निर्णय सर्वांना बंधनकारक राहतील.
९. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश मूल्य आकारले जाणार नाही.
१०. सहभागी स्पर्धकांचा प्रवासखर्च विद्यापीठाने / महाविद्यालयाने प्रशासकीय खर्चातून करावा
११. प्रत्येक स्पर्धकांचे महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत असावे.
१२. राष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊ नये.
१३. ही स्पर्धा फक्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी असेल.

**उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा सहा विभागात घेतली जाईल.**

**१) नृत्य : (DANCE)**

**संकल्पना नृत्य : (CREATIVE DANCE)**

१. यामध्ये एका कलाकाराचा सहभाग असेल व कलाकृती सादर करताना ३ साथीदार सोबत असतील.
२. सहभागी कलाकार नृत्यातून आविष्कार सादर करेल. इतर साथीदार संगीत, संवाद व गाणे या माध्यमातून त्याला साथ देतील.
३. नृत्याचा कालावधी जास्तीत जास्त ७ मिनिटे असेल व ५ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविली बाईल (सादरीकरणाची किमान वेळ ५ मिनिटे असेल)
४. संकल्पना नृत्याच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या संकल्पनेवर आधारित विषयाचा संदेश प्राप्त होणे अपेक्षित आहे.

**२) नाट्य (THEATRE)**

**पथनाट्य:**

१. नाट्यप्रकार पथनाट्य सादर केले जाईल.
२. पथनाट्यामध्ये ४ ते ९ स्पर्धक माग घेतील व त्यात साथीदार समाविष्ट असतील.

३. पथनाट्याचा कालावधी १० मिनीटे असेल व ८ मिनिटानंतर सूचक घंटा वाजविण्यात येईल.

४. पथनाट्यामध्ये संहिता स्वयंसेवकांनी लिहिलेली असल्यास त्यास विशेष प्राधान्य दिले जाईल.

५. पथनाट्यानध्ये लेखी संहिता, संगीत, संवाद, दिग्दर्शकाचे नांव स्पर्धेपूर्वी आयोजक विद्यापीठास सादर करणे बंधनकारक राहील.

६. या प्रकारात ध्वनीक्षेपकांचा वापर अपेक्षित नाही.

**३) संगीत : (MUSIC)**

**(अ) (समूहगीत)**

१. संगीत विभागात समूहगीत सादर केले जाईल.

२. या स्पर्धेत ६ कलाकार सहभाग घेतील व ३ साथीदार साथ देतील.

३. समूहगीत सादरीकरणाचा कालावधी १० मिनिटे असेल व त्यात सलग २ गीते सादर करणे अपेक्षित आहे.

४. त्यात १ लोकगीत (Folk song) व दुसरे देशभक्तीपर (Patriotic) गीत असेल.

५. चित्रपटात सादर झालेले गीत स्पर्धेकरीता निवडू नये.

६. समूहगीत मराठी किंवा हिंदी भाषेत सादर करावे.

**(ब) भारतीय लोक वाद्य**

१. स्पर्धेत एका विद्यापीठाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.

२. रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी २ मिनिटे दिली जातील.

३. संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त दोन असावी.

४. सिनेगीतांना या कला प्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.

५. सादरीकरण गुणवत्ता, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.

६. सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १० मिनिटे दिली जातील व ८ मिनिटानंतर सूचक घंटा होईल.

**(क) भारतीय लोककला पोवाडा, भारुड, भजन इत्यादी**

१. सदर स्पर्धा प्रकारात महाराष्ट्रातील लोककला परंपरेच्या माध्यमातून विविध विषयांवर समाजजागृती करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध लोककला सादर करणे अपेक्षित आहे. उदा. पोवाडा, भारुड, भजन, ओव्या इत्यादी.

२. सदर स्पर्धेत १ स्पर्धक मुलगा/मुलगी भाग घेतील.

३. स्पर्धचा कालावधी ५ मिनिटाचा असेल,

४. सदर स्पर्धेसाठी स्पर्धकास दोन साथीदार/सहाय्यकांचा वापर करता येईल,

**४) ललितकला (FINE ART)**

**भित्तीचित्र (POSTER COMPETITION) घोषवाक्यासह (SLOGAN)**

१. सदर स्पर्धेत २ स्पर्धक (१ मुलगा १ मुलगी सहभाग घेतील. म्हणजेच प्रत्येक विद्यापीठाच्या २ प्रवेशिका असतील.
२. स्पर्धेचा कालावधी अडीच तास असेल.
३. स्पर्धेस लागणारा कागद आयोजक विद्यापीठ उपलब्ध करेल. परंतु इतर साहित्य (उदा. रंग, ब्रश इ.) स्पर्धक व संबंधित विद्यापीठाने आणावयाचे आहे.
४. स्पर्धेचा विषय स्पर्धा सुरु करताना दिला जाईल.
५. भित्तीचित्राच्या मागील बाजूस स्पर्धकाचे नांव विषय व विद्यापीठाचा कोड क्रमांक नमूद करावा.
६. भित्तीचित्रात समर्पक घोषवाक्याचा समावेश असावा.

**५) साहित्य : (LITERATURE)**

**(अ) निबंध**

१. निबंध स्पर्धेत दोन स्पर्धक त्यात १ मुलगा व १ मुलगी सहभागी होणे बंधनकारक राहील.
२. स्पर्धेचा कालावधी २ तास असेल.
३. निबंधाचे २ विषय संघप्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी दिले जातील.
४. प्रत्येक संघाने २ स्पर्धकांची तयारी करुन एकेकाने एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजित वेळी निबंध लिहावयाचा आहे.
५. निबंधाचे माध्यम मराठी, इंग्रजी व हिंदी असेल,

**(ब) वक्तृत्व स्पर्धा :**

१. वक्तृत्व स्पर्धेत १ स्पर्धक (मुलगा किंवा मुलगी) सहभागी होणे बंधनकारक राहील.
२. सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा कालावधी असेल व ३ मिनिटानंतर सूचकघंटा होईल.
३. स्पर्धेचे विषय संघ प्रमुखाच्या बैठकीत पहिल्या दिवशी जाहीर केला जाईल.
४. स्पर्धेदरम्यान जाहीर केलेल्या विषयावरील ठळक मुद्दे लेखी स्वरुपात पंचांकडे सादर करणे बंधनकारक राहील.

**क) कविता:**

१. स्पर्धेत दोन स्पर्धक त्यात १ मुलगा व १ मुलगी सहभागी होणे बंधनकारक राहील.
२. प्रत्येक संघाने २ स्पर्धकांची तयारी करुन एकेकाने एका विषयावर स्पर्धेच्या दिवशी व नियोजित वेळी कविता सादर करावयाची आहे.
३. कवितेचे माध्यम मराठी व हिंदी असेल.
४. सहभागी स्पर्धकास सादरीकरणासाठी ५ मिनिटांचा कालावधी असेल व ३ मिनिटानंतर सूचकघंटा होईल.
५. कवितेमध्ये नविन आशयाचा संदेश असावा.

**६) छायाचित्रण स्पर्धा (Photography)**

१. प्रत्येक सहभागी संघाने स्पर्धेच्या उद्घाटनापासून ते स्पर्धा संपेपर्यंतच्या कालावधीतील छायाचित्रे काढावीत.

२. त्यातून उत्कृष्ट १५ छायाचित्रे लघुमुद्रिका (सी.डी.) स्वरुपात सादर करावयाची आहे.

३. स्पर्धेसाठी लागणारा डिजीटल कॅमेरा सहभागी विद्यापीठाने आणावयाचा आहे.

४. संगणक व संबंधित सामुग्रीची व्यवस्था आयोजन विद्यापीठ करेल.

**७) पथसंचलन :**

पथसंचलन हे उद्घाटन सोहळ्यापूर्वी संपन्न होणे अपेक्षित आहे. “उत्कर्ष” ही स्पर्धा सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा असल्यामुळे सामाजिक समस्येवर आधारित रासेयो उपक्रमातील संबंधित संकल्पना देण्यात येईल. दिलेल्या विषयावर विविध प्रकारे वेशभूषा, रंगसंगती, चलचित्र, घोषवाक्य इ. माध्यमांचा वापर व्हावा. या पथसंचलनाच्या सुरुवातीस समोरच्या बाजूला विद्यापिठाचा बॅनर असावा व त्या पाठोपाठ पथसंचलनाचा चमू असावा. विद्यापीठांतर्गत सहभागी सर्व स्पर्धक पथ संचलनात भाग घेणे अपेक्षित आहे. पथ संचलनाच्या गुणांचा सर्वसाधारण विजेते पद घोषित करताना विचार केला जाणार नाही. नाविन्यपूर्ण, उत्कृष्ट पथ संचलन चमूस फिरता चषक देण्यात येईल.

**८) उत्कर्ष कार्य प्रसिध्दी अहवाल/स्पर्धा (फ्लेक्स बॅनर) :**

२४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या सप्ताहामध्ये विद्यापीठाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांवर आधारित अहवाल तयार करणे अपेक्षित असून, तो अहवाल या स्पर्धेसाठी अपेक्षित आहे आणि या अहवालावर परिक्षकांमार्फत गुण तक्ता तयार करुन सर्वोत्कृष्ट कार्य प्रसिध्दी अहवालास पुरस्कार दिला जातो. या गुणांचा सर्वसाधारण विजेत्या पदासाठी विचार केला जाणार नाही.

१. या स्पर्धेत सहभागी विद्यापीठांनी १ x १ मीटर या आकाराच्या फ्लेक्स (भित्तीचित्र) बनविणे अपेक्षित आहे.

२. या स्पर्धेसाठी प्रत्येक विद्यापीठानी २ फ्लेक्स आणणे अपेक्षित आहे.

**<u>प्रमाणपत्रे व पारितोषिके:</u>**

१. प्रत्येक विभागातील स्पर्धेस अनुसरुन प्रथम ३ उत्कृष्ट विजेत्यांना पारितोषिके दिली जातील.

२. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.

३. स्पर्धेच्या प्रत्येक विभागात फिरता चषक, तसेच सर्वोत्कृष्ट संघास फिरता चषक देण्यात येईल.

**<u>संपर्क आणि स्पर्धा स्थळ :</u>**

**स्थळ:** राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**संपर्क:** डॉ.राजेंद्र वडजे

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, रासयो, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**भम्रणध्वनी:**- ९८८१६९४९१०, **कार्यालय** ०२१७-२७४४७७१/७२/७२/(११लाईन्स) **फॅक्स क्र:-** ०२१७-२३५१३००, **संकेतस्थळ:**- www.sus.ac.in **ईमेल आयडी**:- bcudsu@gmail.com, nss@sus.ac.in

**स्पर्धा दिनांक:** ५ जानेवारी, २०२५ ते ७ जानेवारी, २०२५

# उत्कर्ष प्रवेशिका*

विद्यापीठाचे नांव – ------------------------------------------------------------

पत्ता :- -----------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्र.:- -------------------------- फॅक्स क्र:- ----------------------------

संघप्रमुखाचे नांव:- -----------------------------------------------------------

भ्रमणध्वनी:- ---------------------------------------------------------------------

| अ.क्र | स्पर्धकांची नांवे | वर्ग | महाविद्यालयाचे नांवे | जन्मतारीख |
|---|---|---|---|---|
| मुले | | | | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| मुली | | | | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

विद्यापीठ:- ...........................

विद्यापीठाचे नांव:- --------------------------------------------

प्रवेशिका:-

(उत्कर्ष - प्रवेशिका स्विकारण्याची अंतिम तारीख----------------------)

| अ.क्र. | स्पर्धा | स्पर्धा प्रकार | सहभागी संख्या | साथीदार संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | नृत्य | संकल्पना नृत्य | | |
| २. | नाट्य | पथनाट्य | | |
| ३. | संगीत | अ) समूहगीत<br>ब) भारतीय लोकवाद्य<br>क) भारतीय लोककला | | |
| ४. | ललितकला | भित्तीचित्र व घोषवाक्य | | |
| ५. | साहित्य | अ) निबंध<br>ब) वक्तृत्व<br>क) कविता | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | छायाचित्रण | छायाचित्रण | | |

(टीप:– प्रत्येक विद्यापीठाच्या संघाची एकूण स्पर्धकांची संख्या १९ असेल व साथीदार त्यात समाविष्ट असतील)